

दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे

वर्ष ६ ▪ अंक ४१ ▪ मंगळवार ३ नोव्हेंबर २०२६ ▪ पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainikaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322





अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळातील विजय उमेदवार व कार्यकर्त्यांचा जल्लोष.

अहिल्यानगर जिल्हा बँक निवडणूक

विखे-थोरात गटाचे वर्चस्व, खासदार लंकेंची दमदार एन्ट्री!

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत विखे-थोरात गटाने २१ पैकी १८ जागांवर विजय मिळवत आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. मात्र, संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून असलेल्या पारनेरच्या प्रतिष्ठेच्या लढतीत खासदार नीलेश लंके यांनी दणदणीत विजय मिळवत जिल्हा बँकेच्या राजकारणात यशस्वी आणि दमदार पदार्पण केले आहे. विखे गटासाठी हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे.

जिल्हा बँकेच्या एकूण २१ जागांपैकी ११ जागा यापूर्वीच बिनविरोध झाल्या होत्या, तर उर्वरित १० जागांसाठी काल मतदान आणि आज मंगळवारी सकाळी ९ वाजता मतमोजणी पार पडली. शेतकऱ्यांची कामधेनू मानल्या जाणाऱ्या या बँकेच्या सत्ताकारणात पारनेर मतदारसंघातील लढत विशेष प्रतिष्ठेची बनली होती. येथे विविध कार्यकारी सेवा सोसायटी मतदारसंघातून खासदार



नीलेश लंके यांनी भाजपचे आणि विखे समर्थक उमेदवार राहुल शिंदे यांचा पराभव केला. लंके यांनी एकूण १०४ पैकी ६४ मते मिळवून विजयावर शिक्कामोर्तब केले. या निकालामुळे सहकार क्षेत्रातील राजकीय समीकरणांना आता नवे वळण मिळण्याची शक्यता आहे.

सहकार विकास आघाडी (विखे-थोरात गट) १८ जागांवर विजयी झाली असून, या निवडणुकीत पारनेरमधून लंकेंनी मिळवलेला विजय हेच सर्वात मोठे वैशिष्ट्य ठरले आहे.

निवडणुकीचा निकाल दृष्टिक्षेपात

विविध कार्यकारी सेवा सोसायटी मतदारसंघ (तालुकानिहाय) –

- पारनेर – नीलेश लंके (६४ मते – विजयी) विरुद्ध राहुल शिंदे (४० मते). एकूण मतदान: १०४.
- राहुरी – प्राजक्त तनपुरे (८९ मते – विजयी) विरुद्ध सत्यजित कदम (१८ मते). एकूण मतदान: १०७.
- अकोले: संजीवनी शिंदे (४९ मते – विजयी) विरुद्ध किरण लहामटे (३६ मते). एकूण मतदान: ८५.
- कर्जत – ज्योती शिंदे (५४ मते – विजयी) विरुद्ध तुषार पिसाळ (२० मते). एकूण मतदान: ७५.

इतर मतदारसंघ –

- शेतीपूरक – आ. आशुतोष काळे – (७५० मते – विजयी) विरुद्ध सुधीर मुसळे (१२४ मते). (फरक: ६२६)
- इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) – कारभारी जावळे (२६६४ मते – विजयी) विरुद्ध जालिंदर वाकचौरे (६३२ मते). (फरक: २०४२)
- अनुसूचित जाती-जमाती (एससी/एसटी) – वैभव पिचड (२६८७ मते – विजयी) विरुद्ध प्रशांत लोखंडे (१०८७ मते). (फरक: १६००)
- वि.जा.भ.ज. – गणपतराव सांगळे (२४९४ मते – विजयी) विरुद्ध वैद्य (१२०० मते). (फरक: १२९४)

महिला प्रतिनिधी (दोन जागा) – अनुराधा नागवडे (२६२५ मते – विजयी) आणि संगीता वाघ (२२८३ मते – विजयी). (पराभूत उमेदवार –: हर्षदा काकडे – १४६८ मते, महांडुळे – ४७९ मते)

विखे-थोरात एकजुटीचा सहकारात ऐतिहासिक विजय!

सहकार विकास आघाडीचे जिल्हा बँकेवर निर्विवाद वर्चस्व; १८ पैकी १७ जागांवर दणदणीत विजय

विखे-थोरात एकजुटीला मतदारांची पसंती; अनेक मतदारसंघांत मोठ्या मताधिक्याने उमेदवार विजयी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत सहकार विकास आघाडीने अभूतपूर्व यश संपादन करत १८ पैकी १७ जागांवर विजय मिळविला आहे. जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील या अत्यंत प्रतिष्ठेच्या निवडणुकीत सहकार विकास आघाडीने आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले असून, विखे-थोरात यांच्या राजकीय एकजुटीवर जिल्ह्यातील शेतकरी, सहकारी संस्थांचे प्रतिनिधी आणि बँकेच्या सभासदांनी विश्वासाची मोहोर उमटविली आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, माजी मंत्री शंकरराव गडाख, चंद्रशेखर घुले यांच्यासह जिल्ह्यातील सर्व प्रमुख नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली मिळालेला हा विजय जिल्ह्याच्या राजकीय आणि सहकार क्षेत्रातील महत्त्वपूर्ण घडामोड ठरला आहे.

जिल्हा बँकेची निवडणूक ही केवळ संचालक मंडळाच्या निवडीपुरती मर्यादित नव्हती, तर जिल्ह्याच्या



सहकार क्षेत्रातील नेतृत्व, संघटनशक्ती आणि राजकीय समन्वयाची कसोटी मानली जात होती. या पार्श्वभूमीवर सहकार विकास आघाडीने सुरुवातीपासूनच एकजुटीची भूमिका घेत नियोजनबद्ध पद्धतीने निवडणुकीला सामोरे जाण्याची रणनीती आखली. जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील सहकारी संस्थांचे प्रतिनिधी, शेतकरी आणि सभासद यांच्याशी असलेला संपर्क, स्थानिक नेत्यांमधील समन्वय आणि कार्यकर्त्यांची संघटनात्मक ताकद या सर्व बाबींचा आघाडीला मोठा फायदा झाला.

या निवडणुकीत सहकार विकास आघाडीने केवळ जागांची संख्या मिळविण्यावर समाधान न मानता अनेक मतदारसंघांत प्रतिस्पर्धी उमेदवारांवर मोठ्या मताधिक्याने विजय मिळविला. कृषी, बिगरशेती, अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय तसेच ■ पान ४ वर



कोपरगावात अल्पवयीन मुलाची आत्महत्या

प्रेमसंबंधातून मानसिक त्रास दिल्याचा वडिलांचा आरोप

दैनिक आकर्षण । विशाल लोंढे

कोपरगाव – कोवळ्या वयात जुळलेले प्रेमसंबंध, त्यातून निर्माण झालेला मानसिक तणाव आणि एका महागड्या मोबाईल फोनची मागणी... या सगळ्या घटनांचा शेवट एका अल्पवयीन मुलाच्या दुर्दैवी मृत्यूने झाल्याची धक्कादायक घटना कोपरगाव शहरात समोर आली आहे. अवघ्या १७ वर्षे ७ महिन्यांच्या गोपाल उर्फ संकेत किशोर काथेपुरी याने संजय नगर येथे राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली असून, प्रेमसंबंधातून त्याला मानसिक त्रास दिला जात असल्याचा गंभीर आरोप मृत मुलाच्या वडिलांनी पोलिसांकडे दिलेल्या फिर्यादीत केला आहे. याप्रकरणी कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात एका मुलीविरुद्ध आत्महत्या प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, कोपरगाव शहरातील संजयनगर परिसरात राहणारा गोपाल उर्फ संकेत हा एका बेकरीमध्ये काम करून आपल्या कुटुंबाला हातभार लावत होता. मागील काही वर्षांपासून त्याचे एका मुलीसोबत प्रेमसंबंध असल्याची माहिती कुटुंबीयांना मिळाली होती. यानंतर वडिलांनी मुलाला समजावून सांगितले होते. मात्र, मागील १० ते १५ दिवसांपासून संकेत मानसिक तणावात असल्याचे त्याच्या कुटुंबीयांच्या लक्षात आले.

कामावरून घरी आल्यानंतर तो व्यवस्थित जेवण करत नव्हता. कुटुंबीयांनी त्याच्याकडे विचारपूस केली, मात्र त्याने आपल्या मनातील त्रास कोणालाही सांगितला नाही. दरम्यान, संकेतच्या मित्राकडून मिळालेल्या माहितीनुसार, त्याच्याकडे वाढदिवसासाठी आयफोनची मागणी मुलीकडून करण्यात येत होती. आयफोन दिला नाही, तर प्रेमसंबंध तोडण्याची आणि पुन्हा कधीही बोलणार नसल्याची धमकी दिली जात असल्याचे मित्राने कुटुंबीयांना सांगितल्याचा उल्लेख फिर्यादीत आहे.

दरम्यान, २९ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी संकेतने वडिलांना फोन करून आपण वरच्या खोलीत असल्याचे सांगितले. त्यानंतर सायंकाळी साडेसातच्या सुमारास नातेवाईकांचा फोन आला आणि संकेतचा मृत्यू झाल्याची माहिती कुटुंबीयांना मिळाली. ३० ऑक्टोबर रोजी अंत्यविधी पार पडल्यानंतर वडील घरी आले असता, संकेतच्या खोलीतील कपाटाखाली एक चिठ्ठी मिळाल्याची माहिती नातेवाईकांनी त्यांना दिली.

या चिठ्ठीत प्रेमसंबंधांना चार वर्षे झाल्याचा उल्लेख करत, मागण्या पूर्ण करू न शकल्याबद्दल माफी मागितल्याचे तसेच सगळं तुझ्यामुळे झालं अशा आशयाचे शब्द लिहिले असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. संबंधित चिठ्ठी पोलिसांकडे जमा करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकारामुळे मुलगा मानसिक त्रासाला कंटाळून आत्महत्या करण्यास प्रवृत्त झाल्याचा आरोप वडिलांनी केला असून, कोपरगाव शहर पोलीस स्टेशनमध्ये ■ पान ४ वर

अवघ्या १,२१८ दिवसांत सरदार पटेल यांनी ते साध्य केले, जे अनेक महान नेत्यांना संपूर्ण आयुष्यातही करता आले नाही

काँग्रेसने सरदार पटेल यांच्या महान व्यक्तिमत्त्वाला दुय्यम ठरवण्याचा प्रयत्न केला, तर पंतप्रधान मोदी यांनी 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'च्या माध्यमातून त्यांना जागतिक स्तरावर ओळख आणि सन्मान मिळवून दिला

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– ३१ मार्च २०२६ रोजी भारत नक्षलवादमुक्त झाला; आता ३१ डिसेंबर २०२९ पर्यंत अमली पदार्थांचा व्यापार संपवण्याचे लक्ष्य. सरदार वल्लभभाई पटेल यांचे नाव भारताच्या इतिहासात सामर्थ्याच्या लोखंडी स्तंभाप्रमाणे कोरले गेले आहे. स्वातंत्र्यानंतर देशासमोर विघटनाचे संकट उभे असताना त्यांनी संपूर्ण देशाला एकत्र आणून अखंड भारताचा पाया रचला. सरदार पटेल यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजऱ्या होणाऱ्या या प्रसंगी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिल्ली येथे 'रन फॉर युनिटी'ला हिरवा झेंडा दाखवला. यावेळी त्यांनी अवघ्या १,२१८ दिवसांत सरदार पटेल यांनी असे कार्य पूर्ण केले, जे संपूर्ण जगाला अशक्य वाटत होते, याची आठवण करून दिली

.भारताला स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा देशाच्या भविष्याबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले होते. संपूर्ण देशात शेकडो संस्थाने विखुरलेली होती. मात्र, सरदार पटेल यांची राजकीय दूरदृष्टी, असामान्य मुत्सद्देगिरी आणि पोलादी इच्छाशक्तीने या सर्व शंका दूर केल्या. त्यांनी विखुरलेल्या संस्थानांना



एकत्र आणून आधुनिक भारताच्या भौगोलिक नकाशाला नवी ओळख दिली. ते केवळ स्वातंत्र्यलढ्यातील नायक नव्हते, तर अखंड भारताचे शिल्पकार होते. त्यांच्या दूरदृष्टीने देशाच्या इतिहासाला नवी दिशा दिली. दुर्दैवाने, काँग्रेसच्या राजवटीत सरदार पटेल यांच्या ऐतिहासिक योगदानासाठी त्यांना अपेक्षित ओळख आणि सन्मान मिळाला नाही. काँग्रेसने त्यांच्या महान वारशाला विस्मृतीत ढकलण्याचा प्रयत्न केला; मात्र राजकीय उपेक्षेच्या ढगांनी इतिहासाचा सूर्य झाकला जाऊ शकत नाही. गुजरातचे मुख्यमंत्री असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'च्या उभारणीसाठी पुढाकार घेतला आणि सरदार पटेल यांना जागतिक स्तरावर ओळख मिळवून दिली. आज हा पुतळा त्यांच्या महान व्यक्तिमत्त्वाचे आणि अखंड भारताच्या संकल्पनेचे प्रतीक म्हणून उभा आहे.

ज्याप्रमाणे सरदार पटेल यांनी आपल्या अढळ निर्धाराच्या बळावर शेकडो संस्थानांना एकत्र आणले, त्याचप्रमाणे मोदी सरकारच्या नेतृत्वाखाली अमित शाह भारताची अंतर्गत सुरक्षा आणि राष्ट्रीय एकता अधिक मजबूत करण्यासाठी त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून कार्य करत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली ३१ मार्च २०२६ रोजी भारत नक्षलवादमुक्त झाला. आता ३१ डिसेंबर २०२९ पर्यंत देशाला अमली पदार्थमुक्त करण्याचे पुढील लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. ही केवळ अमली पदार्थांविरोधातील मोहीम नसून देशातील तरुण पिढीचे संरक्षण करण्याची आणि विकसित भारताचा भक्कम पाया घालण्याची वचनबद्धता आहे. सरदार पटेल यांनी त्यांच्या काळात देशाच्या विघटनाचे आव्हान परतवून लावले. आज अमित शाह त्याच पोलादी निर्धाराचा वारसा पुढे नेत भारताला अंतर्गत आव्हानांपासून मुक्त करण्याच्या दिशेने कार्य करत आहेत.

द ग्रीन व्हॅली प्रीस्कूलमध्ये चिमुकल्यांनी घेतला जपानी संस्कृतीचा अनुभव स्कूलमध्ये अकीमत्सुरी उत्सव उत्साहात साजरा

जपानी भाषा संगीत, नृत्य अन् लोककथांतून चिमुकल्यांना जपानच्या परंपरांची ओळख

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– येथील द ग्रीन व्हॅली प्रीस्कूलमध्ये जपानचा पारंपरिक शरद ऋतू उत्सव अकीमत्सुरी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवामध्ये जपानी भाषा, संगीत, नृत्य आणि लोककथांच्या माध्यमातून चिमुकल्यांना जपानची संस्कृती, परंपरा आणि निसर्गसौंदर्याची अनोखी ओळख करून देण्यात आली. विविध उपक्रमांतून चिमुकल्यांनी या उत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

जपानमधील शरद ऋतू निसर्गसौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे. या काळात बर्फाच्छादित माऊंट फुजी पर्वताच्या परिसरातील मॅपल वृक्षांची लाल, केशरी आणि पिवळी पाने निसर्गाला मनोहारी रूप देतात. याच संकल्पनेवर आधारित शाळेतील नोटीस बोर्ड आणि डिस्प्ले बोर्ड शिक्षिकांनी आकर्षक पद्धतीने सजविले होते. त्यावर माऊंट फुजी पर्वत आणि रंगीबेरंगी मॅपल पानांचे सुंदर चित्रण करण्यात आले होते.

शाळेच्या संचालिका प्राचार्या उमंग नंदा यांनी सांगितले की शाळेत जपानी भाषा शिकविली जात असल्याने विद्यार्थ्यांना जपानी भाषा, माऊंट फुजी पर्वत आणि तेथील संस्कृतीची आधीपासूनच ओळख आहे. या उत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना



जपानच्या परंपरा आणि सांस्कृतिक वैशिष्ट्ये अनुभवण्याची संधी मिळाली.कार्यक्रमात काही विद्यार्थ्यांनी जपानी भाषेत स्वतःची ओळख करून दिली, तर काहींनी जपानी भाषेत माऊंट फुजी पर्वताची माहिती सांगितली. विद्यार्थ्यांनी जपानी गाण्यांवर नृत्य सादर केले. प्ले ग्रुप आणि नर्सरीच्या चिमुकल्यांनी किरा किरा हिराकू या लोकप्रिय जपानी गाण्यावर केलेल्या नृत्याने उपस्थितांची मने जिंकली.त्सुकी नो उसागी' (चंद्रावरील ससा) ही जपानी लोककथा. या कथेतून विद्यार्थ्यांना जपानच्या लोकसाहित्याची ओळख झाली. तसेच भारतीय कोजागिरी पौर्णिमा आणि जपानमधील ओत्सुकिमी या चंद्रदर्शनाच्या परंपरेतील साम्यही विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. ओत्सुकिमी उत्सवात कुटुंबातील सर्व सदस्य एकत्र येऊन शरद ऋतूतील पौर्णिमेच्या चंद्राचे सौंदर्य अनुभवतात ही माहितीही विद्यार्थ्यांना देण्यात आली.

लहान वयातच विद्यार्थ्यांना विविध देशांच्या भाषा, संस्कृती, परंपरा आणि जीवनशैलीची ओळख करून देऊन त्यांच्यामध्ये जागतिक दृष्टिकोन, सांस्कृतिक कुतूहल आणि विविधतेविषयी आदर निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या अभिनव उपक्रमामुळे चिमुकल्यांना जपानविषयी नव्या गोष्टी शिकण्याची संधी मिळाली असे त्या म्हणाल्या.

शेख यांच्या प्रलंबित सेवानिवृत्ती वेतन प्रस्तावाबाबत

मा. शालिनीताई विखे पाटील यांचा मदतीचा हात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– एस.एफ.शेख ग्रामविकास अधिकारी ता. करमाळा जि. सोलापूर येथे कार्यरत होते. ते मूळ राहणारे अहिल्यानगर चे आहेत.त्यांना सेवानिवृत्त होऊन साडेतीन वर्ष झाली,तरीही त्यांना सेवानिवृत्तीचे लाभ आणि वेतन अप्राप्त होते.सुधारित आश्वासीत प्रगती योजना दुसरा व तिसरा लाभ नियमानुसार मिळालेला नव्हता. त्या प्रलंबित देय सेवानिवृत्ती लाभ नियमानुसार मिळणेबाबत त्यांनी मा. शालिनीताई विखे पाटील



यांची भेट घेऊन चर्चा केली होती.मा. शालिनीताई विखे पाटील यांनी तात्काळ सोलापूर जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी चर्चा केली. तसेच तात्काळ प्रलंबित प्रस्ताव पडताळणी करून नियमानुसार मंजूर करणे बाबत योग्य ती कार्यवाही करावी असे सूचीत केले. त्यानंतर चार दिवसातच म्हणजे दिनांक २ नोव्हेंबर रोजी सोलापूर जिल्हा परिषदेच्या अधिकारी सदस्य समितीची बैठक होऊन आश्वासीत प्रगतीचा लाभ प्रस्ताव मंजूर करण्यात आला,असे शेख यांनी सांगितले.त्यामुळे आतां वेतनपडताळणी होऊन लौकरच प्रलंबित सेवानिवृत्ती वेतन आणि इतर देय लाभ प्राप्त होतील.याबाबत शेख यांनी माननीय शालिनीताई विखे पाटील यांनी तात्काळ केलेल्या कार्यवाही बाबत त्यांचे आभार मानले आहेत.

आनंदऋषीजी हॉस्पिटलने आरोग्यसेवेचे कामधेनू म्हणून नावलौकिक मिळविला – वसंत लोढा

आईच्या स्मृतीदिनानिमित्त लोढा परिवाराचा आरोग्यसेवेचा संकल्प; आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत कॅन्सर तपासणी शिबिर
१२५ रुग्णांची मोफत तपासणी; गरजूंना अल्पदरात शस्त्रक्रिया व कॅन्सर उपचारांवर विशेष सवलत

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– निस्वार्थ आरोग्यसेवेच्या माध्यमातून श्री आनंदऋषीजी हॉस्पिटलने आरोग्यसेवेचे कामधेनू म्हणून नावलौकिक मिळविला आहे. या सेवाकार्यात लोढा परिवाराला योगदान देता येत असल्याचा आनंद आणि समाधान आहे. अहिल्यानगर जिल्ह्यासाठी आरोग्यसेवेचे महत्त्वपूर्ण केंद्र बनलेल्या या हॉस्पिटलचा विस्तार आता इतर जिल्ह्यांमध्येही होत आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांतून रुग्ण येथे उपचारासाठी येत असून, आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या आरोग्यसेवेची महती देशभर पोहोचत आहे, असे प्रतिपादन वसंत लोढा यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे स्व. मानकुंवरबाई हस्तिमलजी लोढा यांच्या स्मरणार्थ लोढा परिवाराच्या वतीने मोफत कॅन्सर तपासणी व सवलतीच्या दरात उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी वसंत लोढा बोलत होते. विशेष म्हणजे, या शिबिराचे उद्घाटन अनामप्रेम संस्थेतील अंध मुला-मुलींच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी अनामप्रेम संस्थेतील मुला-मुलींनी आनंदऋषीजी महाराज यांच्या जीवनावर आधारित गीत सादर करून त्यांना अभिवादन केले. तसेच आईवरील भावस्पर्शी गीत सादर करून स्व. मानकुंवरबाई यांना आदरांजली वाहण्यात आली. अंध मुला-मुलींनी सादर केलेल्या गीतांनी उपस्थितांचे मन हेलावून गेले. या भावनिक सादरीकरणामुळे अनेकांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. यावेळी लोढा परिवाराच्या



वतीने अनामप्रेम संस्थेला आर्थिक मदतही देण्यात आली.

या उद्घाटन सोहळ्याला पारस लोढा, पोपट लोढा, सौ. लता लोढा, उषा लोढा, मीना लोढा, श्री विशाल गणपती देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर, अशोक कानडे यांच्यासह लोढा परिवारातील सदस्य व मित्रमंडळी उपस्थित होते. तसेच संतोष बोथरा, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. वसंत कटारिया यांच्यासह जैन सोशल फेडरेशनचे सदस्य, अनामप्रेम संस्थेचे अजित माने, कॅन्सर सर्जन डॉ. अनिकेत शिंदे, डॉ. तुषार मुळे, डॉ. रविंद्र मुथा, डॉ. तृप्ती पाटील आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, लोढा परिवाराने सामाजिक सेवेचे व्रत स्वीकारले असून, पिढ्यानपिढ्या त्यांचे सामाजिक कार्य सुरू आहे. समाजसेवेला आपल्या कार्याचा कणा मानून हा परिवार विविध उपक्रमांमध्ये योगदान देत आहे. आईच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त लोढा परिवाराने जैन सोशल फेडरेशनच्या महावीर युनिव्हर्सिटीला मोठी देणगी दिली होती. याशिवाय अनेक मोठ्या सामाजिक प्रकल्पांमध्येही परिवाराचा हातभार लागला आहे. आईचा स्मृतिदिन सामाजिक कार्याच्या माध्यमातून साजरा करण्याचा हा उपक्रम इतरांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविणे हॉस्पिटलचे मुख्य उद्देश आहे. या कार्यामागे पैसा कमावणे हा उद्देश नसून, आनंदऋषीजी हॉस्पिटलने समाजाचा विश्वास संपादन केला आहे, असेही त्यांनी नमूद केले.

कॅन्सर सर्जन डॉ. अनिकेत शिंदे यांनी सांगितले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये सर्व प्रकारच्या कॅन्सरवरील शस्त्रक्रिया केल्या जातात. त्याचबरोबर केमोथेरपीची सुविधाही उपलब्ध आहे. तंबाखू, सिगारेट यांसारख्या व्यसनांमुळे कॅन्सरचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे नागरिकांनी अशा व्यसनांपासून दूर राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. प्रकाश कांकरिया म्हणाले की, लोढा परिवार समाजाशी घट्ट जोडलेला आहे. सौ. लता लोढा नगराध्यक्षा असताना आनंदऋषीजी हॉस्पिटलची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. हॉस्पिटलच्या उभारणीपासूनच लोढा परिवार या आरोग्य मंदिराशी जोडला गेला असून, आरोग्यसेवेच्या कार्यात त्यांचे सातत्याने योगदान राहिले आहे.

ॲड. अभय आगरकर म्हणाले की, स्व. मानकुंवरबाई लोढा यांनी आपल्या मुलांवर सामाजिक सेवेचे संस्कार घडविले. आई-वडिलांकडून मिळालेला सामाजिक कार्याचा वारसा तिन्ही बंधू पुढे घेऊन जात आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटलचा प्रवास समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याच्या दिशेने सुरू आहे. दानशूर व्यक्ती आणि परिवार जेव्हा सामाजिक कार्यासाठी पुढे येतात, तेव्हाच असे मोठे समाजोपयोगी प्रकल्प उभे राहू शकतात, असे त्यांनी सांगितले.

या शिबिरात एकूण १२५ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर गरजेनुसार रुग्णांवर अल्पदरात शस्त्रक्रिया करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच विविध प्रकारच्या थेरपी आणि कॅन्सर उपचारांवर विशेष सवलत देण्यात आली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले, तर प्रकाश छल्लाणी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

समाजात शांतता, एकोपा आणि बंधुभाव निर्माण करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेणे काळाची गरज – डॉ. रफिक सय्यद

सदभावना पुरस्कार प्रहार अकॅडमीचे नायब सुभेदार विनोद सिंह परदेशी यांना प्रदान



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– सावित्री फातिमा सद्भावना विचार मंचच्या वतीन २०२६ चा सदभावना पुरस्कार प्रहार अकॅडमीचे नायब सुभेदार विनोद सिंह परदेशी यांना प्रदान करण्यात आला.

विनोद सिंह परदेशी कोणताही जातिभेद किंवा पक्षपात न करता अनेक विद्यार्थ्यांना उत्तम प्रशिक्षण देऊन देशसेवेसाठी तयार करण्याचे प्रशंसनीय कार्य करत आहेत. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून त्यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी सदभावना मंचाचे राज्य सचिव डॉ. रफीक पारनेरकर, जिल्हा उपाध्यक्ष अशोक सब्बन, जिल्हा सचिव कॉ.फिरोज शेख, कोषाध्यक्ष राजुभाई शेख, सदस्य जैद खान, उमर शेख तसेच अकॅडमीचे शिक्षकवृंद, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ.रफीक पारनेरकर यांनी आधुनिक विज्ञान,मोहम्मद पैगंबर, संत तुकाराम महाराज, आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा संदर्भ देत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. चांगले संस्कार, शिस्त, प्रामाणिकपणा, मानवता आणि उच्च चारित्र्य यांचे महत्त्व त्यांनी सांगितले. देशात आणि राज्यात सामाजिक सलोखा, शांतता आणि बंधुभाव अबाधित राहावा, यासाठी सातत्याने विविध विधायक उपक्रम राबविणे अत्यंत आवश्यक आहे. विविध जाती, धर्म, पंथ, भाषा आणि संस्कृती असलेल्या भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात एकता आणि सामाजिक सदभावना हीच लोकशाहीची खरी ताकद आहे.

आजच्या काळात समाजमाध्यमां वरील अफवा, गैरसमज, धार्मिक व जातीय तेढ तसेच परस्परां बद्दल वाढणारे गैरसमज यामुळे सामाजिक वातावरणावर परिणाम होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत समाजामध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण करणे आणि एकमेकांच्या भावना व विचारांचा आदर करण्याची संस्कृती रुजवणे गरजेचे आहे.असे नमुद करत,यासाठी विविध सामाजिक संस्था, युवक मंडळे, महिला संघटना, शैक्षणिक संस्था, लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे असे सांगितले. सर्वधर्मीय स्नेहमेळावे, शांतता रॅली, संविधान जनजागृती कार्यक्रम, व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम, रक्तदान शिबिरे, स्वच्छता अभियान आणि सामाजिक ऐक्याचे उपक्रम आयोजित केल्यास समाजातील विविध घटकांमध्ये संवाद आणि आपुलकी वाढण्यास मदत होईल.विशेषतः तरुण पिढीमध्ये बंधुभाव, सहिष्णुता, राष्ट्रीय एकात्मता आणि संविधानिक मूल्यांची जाणीव निर्माण करणे महत्त्वाचे आहे. मतभेद असले तरी मनभेद होऊ नयेत, हा विचार प्रत्येकाने आपल्या आचरणातून जपला पाहिजे. कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता सत्यता पडताळणे आणि समाजात शांतता राखण्यासाठी जबाबदारीने वागणे ही प्रत्येक नागरिकाची भूमिका असली पाहिजे.सामाजिक सदभावना ही केवळ एखाद्या दिवसापुरती किंवा कार्यक्रमापुरती मर्यादित न राहता ती आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनली पाहिजे. समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन विश्वास, प्रेम, समानता आणि बंधुभावाचे वातावरण निर्माण करण्यासाठी सामूहिक प्रयत्न होणे आवश्यक आहे.

देशाची प्रगती, राज्याचा विकास आणि समाजाचे उज्ज्वल भविष्य हे सामाजिक ऐक्याशी जोडलेले आहे. त्यामुळे देशात आणि राज्यात शांतता, एकोपा व सदभावना कायम राहावी यासाठी प्रत्येक नागरिकाने आपले योगदान देणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले.

खेर्डा प्रकल्पासाठी जायकवाडीतून ९० दलघमी पाणी सोडा!

खासदार डॉ. कल्याण काळे यांचे जलसंपदा मंत्र्यांना साकडे; ४० ग्रामपंचायतींच्या पाणीप्रश्नाकडे वेधले लक्ष

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पैठण– पैठण तालुक्यातील खेर्डा प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या मंजूर पाणी हक्कानुसार जायकवाडी धरणातून ९० दलघमी (३.१८ टीएमसी) पाणी तातडीने उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री शंभूराज देसाई यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजनेच्या टप्पा क्रमांक दोनअंतर्गत येणाऱ्या पैठण तालुक्यातील सुमारे ४० ग्रामपंचायतींसाठी खेर्डा प्रकल्प महत्त्वाचा आहे. या परिसरातील नागरिकांचे पिण्याचे पाणी, पशुधनाची तहान आणि शेतीचे सिंचन या योजनेवर अवलंबून आहे. शासनाकडून ९० दलघमी पाणी मंजूर असतानाही प्रत्यक्षात पाणी उपलब्ध होत नसल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

पाण्याअभावी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून जनावरांसाठी पाण्याची व्यवस्था करताना पशुपालकांची दमछाक होत आहे. त्यातच रब्बी आणि आगामी



उन्हाळी हंगामातील शेतीचे नियोजनही अडचणीत आले आहे. मंजूर पाणीहक्क असूनही शेतकऱ्यांना हक्काच्या पाण्यापासून वंचित राहावे लागत असल्याने या प्रश्नावर तातडीने निर्णय घेण्याची गरज असल्याचे खासदार काळे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

पाणीवाटपाचे वेळापत्रक जाहीर करण्याची मागणी जायकवाडी धरणातून खेर्डा प्रकल्पासाठी मंजूर ९० दलघमी पाणी तातडीने सोडावे, संबंधित ४० ग्रामपंचायतींना पिण्यासाठी व पशुधनासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे, रब्बी व उन्हाळी हंगामासाठी सिंचनाच्या पाण्याचे अधिकृत वेळापत्रक जाहीर करावे, तसेच मंजूर पाणीहक्कानुसार शेतकऱ्यांना न्याय्य पाणीवाटपाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी, अशा प्रमुख मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, या मागणीसाठी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनीही पाठपुरावा केला. यावेळी नगरपालिकेचे माजी गटनेते भाऊसाहेब जगताप, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष रमेश पाटील मुळे, जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष दिलीपराव भोसले, जिल्हा कार्यकारी सदस्य संभाजी काटे, जिल्हा सरचिटणीस लतीफ सय्यद आणि जिल्हा सचिव सदानंद खडसान उपस्थित होते.

खेर्डा प्रकल्पाच्या पाण्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावून ४० ग्रामपंचायतींमधील नागरिक, शेतकरी आणि पशुपालकांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. आता जलसंपदा विभाग यावर काय निर्णय घेतो, याकडे पैठण तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा
फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

दै. आकर्षण निवडक



कु.रोजिना रिझवान शेख या विद्यार्थीनीचा एम.बी.बी.एस. या अभ्यासक्रमास प्रवेश झाला. फातेमा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स कॉलेज ,गोकाक या महाविद्यालयात वैद्यकीय शिक्षण घेणार आहे.त्याबाबत कु.रोजिना सह तिचे वडील डॉ.रिझवान अहमद आणि डॉ.रेश्मा रिझवान यांचा अभिनंदन करून सत्कार करण्यात आला.

शिक्षक भारतीच्या पाठपुराव्याला यश; पीएटीपरीक्षा आता डिसेंबरमध्ये

अहिल्यानगर - राज्यातील शाळांमध्ये भाषा, गणित आणि इंग्रजी या विषयांसाठी घेण्यात येणारी संकलित मूल्यमापन चाचणी () क्रमांक १ आता डिसेंबर महिन्यात होणार आहे. यापूर्वी ही परीक्षा नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात होणार होती. मात्र, दिवाळीच्या दीर्घ सुट्टीनंतर लगेचच परीक्षा घेतल्यास विद्यार्थ्यांना अभ्यासाची उजळणी करण्यासाठी पुरेसा वेळ मिळणार नाही, तसेच सुट्टीनंतर काही विद्यार्थी शाळेत उशिरा हजर झाल्यास ते परीक्षेपासून वंचित राहण्याची शक्यता होती. या सर्व बाबींचा विचार करून शिक्षक भारती संघटनेने परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्याकडे केली होती. शिक्षक भारती संघटनेच्या या मागणीला यश आले असून, आता ही परीक्षा २, ३ आणि ५ डिसेंबर २०२६ रोजी घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. यासंदर्भात शिक्षक नेते तथा शिक्षक भारती संघटनेचे राज्यसचिव सुनील गाडगे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन परीक्षांचे वेळापत्रक निश्चित होणे आवश्यक आहे. दिवाळीच्या दीर्घ सुट्टीनंतर लगेच परीक्षा घेतल्यास विद्यार्थ्यांना अभ्यासाची पुरेशी तयारी करता येणार नाही. तसेच ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी सुट्टीनंतर काही दिवस उशिराने शाळेत दाखल होण्याची शक्यता असते. त्यामुळे कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये आणि सर्व विद्यार्थ्यांना तयारीसाठी पुरेसा वेळ मिळावा, या भूमिकेतून शिक्षक भारतीने ही मागणी केली होती. शिक्षणमंत्र्यांनी शिक्षकांच्या या रास्त मागणीची दखल घेऊन परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतल्याने विद्यार्थी आणि शिक्षकांना दिलासा मिळाला आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी शिक्षक भारती संघटना यापुढेही सातत्याने पाठपुरावा करेल. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल राज्य कार्याध्यक्ष सुभाष मोरे राज्य सचिव तथा शिक्षक नेते सुनील गाडगे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे उपाध्यक्ष अप्पासाहेब जगताप.विजय लंके .आनंद झरेकर .आशादेवी गाडगे/ लंके यांनी शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांचे आभार मानले. या पाठपुराव्यासाठी शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे उपाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, जिल्हा सचिव विजय कराळे, जिल्हा कार्याध्यक्ष संजय पवार, कैलास जाधव कार्यवाह संजय भुसारी योगेश हराळे, नवनाथ घोरपडे, सुदाम दिघे, संभाजी पवार, हनुमंत रायकर, सिकंदर शेख, संतोष देशमुख, किसन सोनवणे, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, विभावरी रोकडे, मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुंज, छाया लष्करे, जया गागरे, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर तसेच विनाअनुदानित राज्याध्यक्ष रूपाली कुरूमकर यांनी विशेष प्रयत्न केले. शिक्षक भारतीच्या संघटित पाठपुराव्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा निर्णय होण्यास मदत झाली आहे.

मर्चंटस बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नितीन भंडारी यांची निवड

मर्चंटस बँकेला शिस्तबद्ध आणि आदर्श कारभाराची परंपरा – मंत्री जयकुमार गोरे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहमदनगर मर्चंटस को ऑप बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नितीन भंडारी यांची निवड झाली आहे. या निवडीबद्दल मुंबई येथे राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी भंडारी यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी बँकेचे चेअरमन संजय चोपडा उपस्थित होते.

मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, सुवर्ण महोत्सवी टप्पा ओलांडणारी अहमदनगर मर्चंटस बँक राज्यातील आदर्शवत सहकारी बँक म्हणून ओळखली जाते. संस्थापक हस्तीमलजी मुनोत यांच्या सारखे दूरदृष्टीचे नेतृत्व बँकेला लाभले आहे. त्यांच्यासह सर्व संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी अतिशय समर्पित भावनेने काम करत असतात. सभासदांचा दृढ विश्वास आणि शिस्तबद्ध कारभार या बँकेचे वैशिष्ट्य आहे. आधुनिक स्पर्धेच्या युगात बँकेने सर्व



प्रकारच्या डिजिटल बँकिंग सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. भंडारी यांच्या सारख्या अनुभवी अधिकाऱ्यांचा बँकेला कामकाज करताना निश्चितच लाभ होईल.

चेअरमन संजय चोपडा म्हणाले, मर्चंटस बँकेने सुवर्ण वर्षानिमित्त सभासदांना ५१०० रूपयांची ठेव पावती देण्याचा निर्णय घेतला. या प्रस्तावास आवश्यक परवानग्या मिळवून देण्यासाठी मंत्री जयकुमार गोरे, आमदार संग्राम जगताप, अनुप काळे यांनी मोलाचे सहकार्य केले. नूतन सीईओ नितीन भंडारी हे स्थापनेपासून बँकेत कार्यरत आहेत. संस्थापक चेअरमन हस्तीमलजी मुनोत मार्गदर्शनाखाली काम करण्याचा मोठा अनुभव त्यांच्याकडे आहे. त्यांनी अनेक वर्षे जॉइंट सीईओ म्हणून कामकाज पाहिले आहे. सहकार बँकिगचा त्यांना मोठा अभ्यास आहे. आता मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणूनही ते ठसा उमटवणारे काम करतील असा विश्वास चोपडा यांनी व्यक्त केला.

या निवडीबद्दल नितीन भंडारी यांचे आमदार संग्राम जगताप, बँकेचे संस्थापक चेअरमन व विद्यमान ज्येष्ठ संचालक हस्तीमलजी मुनोत, माजी उपमहापौर गणेश भोसले, मनपाचे गटनेते नगरसेवक प्रकाश भागानगरे, नफीस चुडीवाला, रवींद्र सेलोत, संतोष तातेड, मिलिंद कुलकर्णी, संतोष गुगळे, आप्पा नगरकर व सर्व संचालक मंडळाने अभिनंदन केले आहे.

रेशन कार्ड, धान्यासाठी नागरिकांची फरफट; रिपब्लिकन सेनेचे पुरवठा कार्यालयाला टाळे ठोको आंदोलन

'सर्व्हर डाऊन'च्या नावाखाली एक ते दोन महिने नागरिकांना प्रतीक्षा; चार–पाच महिने धान्यापासून वंचित ठेवल्याचा सुनील शिंदे यांचा आरोप



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर शहरातील गोरगरीब व गरजू कुटुंबांना नवीन रेशन कार्ड तसेच रेशनिंगचे धान्य मिळण्यात येणाऱ्या अडचणींच्या निषेधार्थ रिपब्लिकन सेनेच्या वतीने शहर अन्नधान्य पुरवठा वितरण कार्यालयाला टाळे ठोको आंदोलन करण्यात आले. यावेळी कार्यालयासमोर निदर्शने करून प्रशासनाच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात जिल्हा महासचिव दिलीप साळवे, जिल्हा उपाध्यक्ष बाळू वाघमारे, महिला शहराध्यक्ष मंगल बरकडे, मोना घोरपडे, संगीता साठे, आशा सावंत, वैशाली शिरसाठ, रूपाली आयची, अविद्या ठोंबरे आदींसह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर शहर अन्नधान्य पुरवठा कार्यालयात गेल्या एक ते दोन महिन्यांपासून सर्व्हर डाऊन आहे असे कारण सांगून नागरिकांना वारंवार हेलपाटे मारण्यास भाग पाडले जात आहे. शहरातील गोरगरीब व गरजू नागरिक नवीन रेशन कार्ड, दुबार रेशन कार्ड तसेच नाव समाविष्ट करणे व ट्रान्सफर यांसारख्या कामांसाठी ऑनलाइन अर्ज करण्याकरिता कार्यालयात येतात. मात्र, सर्व्हर बंद असल्याचे कारण देत त्यांना कोणतेही समाधानकारक उत्तर दिले जात नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

विशेष म्हणजे, लाभार्थ्यांचे नाव कमी करण्यासाठी अवघ्या पाच ते दहा मिनिटांत प्रक्रिया पूर्ण केली जाते; मग नवीन लाभार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज झाल्यानंतरही त्यांना रेशनिंगचे धान्य मिळण्यासाठी चार ते पाच महिने का लागतात, असा सवाल सुनील शिंदे यांनी उपस्थित केला. अनेक लाभार्थी रेशन दुकानात धान्य घेण्यासाठी गेल्यानंतर दुकानदारांकडून तुमचे नाव अद्याप ऑनलाइन आलेले नाही, असे सांगितले जाते. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांना धान्यापासून वंचित राहावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

गोरगरीब नागरिकांच्या अन्नधान्याशी संबंधित प्रश्नांकडे पुरवठा विभागाने गांभीर्याने लक्ष देऊन नवीन रेशन कार्ड, नाव समाविष्ट करणे तसेच धान्य वितरणातील प्रलंबित अडचणी तातडीने दूर कराव्यात, अशी मागणी रिपब्लिकन सेनेच्या वतीने करण्यात आली आहे. प्रशासनाने या प्रश्नांची वेळीच दखल घेतली नाही, तर पुरवठा विभागाच्या विरोधात जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

दुष्काळात शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही; शिवसेनेची मदतीसाठी धाव

आदित्य ठाकरे ४ नोव्हेंबरला अहिल्यानगर दौऱ्यावर; नेवासा, पारनेरमध्ये शेतकरी मदत केंद्रांचे उद्घाटन, बांधावर जाऊन साधणार संवाद

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– दुष्काळाच्या संकटाने शेतकरी पुरता हवालदिल झाला असताना केवळ आश्वासनांची खैरात करण्याऐवजी शेतकऱ्यांच्या मदतीला प्रत्यक्ष धावून जाण्याचा निर्णय शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने घेतला आहे. काबाडकष्ट करून शेतात घाम गाळणाऱ्या शेतकऱ्याला त्याच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळालाच पाहिजे, अशी भूमिका घेत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार राज्यभर शेतकरी मदत केंद्रे सुरू करण्यात येणार आहेत. याच उपक्रमाचा भाग म्हणून अहिल्यानगर जिल्ह्यातही शेतकरी मदत केंद्रे उभारण्यात येणार असून, ४ नोव्हेंबर रोजी शिवसेना नेते तथा युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या हस्ते नेवासा तालुक्यातील कुकाणा आणि पारनेर येथे या केंद्रांचे उद्घाटन होणार आहे. यावेळी आदित्य ठाकरे शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेणार आहेत. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी आणि रामदास गोल्हार यांनी ही माहिती दिली.

जिल्ह्यात पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामाचे मोठे नुकसान झाले आहे. पिके हातची गेली, रब्बी हंगामाची चिंता सतावत आहे, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे, तर अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ आली आहे. एकीकडे शेती उत्पादनात घट, दुसरीकडे वाढता उत्पादन खर्च, कर्जाचा बोजा आणि बाजारभावातील अनिश्चितता अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. सरकारी मदतीच्या घोषणा होत असल्या तरी प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांच्या हातात कधी पडणार, हा प्रश्न कायम आहे. पंचनामे, निकष आणि प्रशासकीय प्रक्रियांच्या चक्रात शेतकऱ्यांना अडकवून ठेवण्याऐवजी त्यांना तातडीने दिलासा मिळणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेने शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घेतला आहे.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना कोणत्या प्रकारची मदत आवश्यक आहे, त्यांच्या समस्या काय आहेत आणि प्रशासनाकडून कोणत्या उपाययोजना होणे गरजेचे आहे, यासाठी जिल्ह्यात शेतकरी मदत केंद्रांच्या माध्यमातून मदतीची यंत्रणा उभी केली जाणार आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारी, नुकसान, पाणीटंचाई, चारा उपलब्धता आणि शासकीय मदतीसंदर्भातील अडचणी समजून घेऊन त्यांचा पाठपुरावा करण्यावर या केंद्रांचा भर राहणार आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी केवळ निवेदने देऊन थांबायचे नाही, तर त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रत्यक्ष मैदानात उतरायचे, असा पक्षाचा निर्धार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

४ नोव्हेंबर रोजी आदित्य ठाकरे दुपारी १२ वाजता नेवासा येथे दाखल होतील. त्यानंतर कुकाणा येथे शेतकरी मदत केंद्राचे उद्घाटन करून ते शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करण्याचाही त्यांच्या दौऱ्यात समावेश आहे. त्यानंतर ते अहिल्यानगर शहरात येणार असून, शिवसेनेच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात येईल. शहरात पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी ते संवाद साधणार आहेत. दौऱ्याच्या पुढील टप्प्यात पारनेर येथे शेतकरी मदत केंद्राचे तसेच शिवसेना कार्यालयाचे उद्घाटन आदित्य ठाकरे यांच्या हस्ते होणार आहे. या वेळीही ते बांधावर जाऊन शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेणार आहेत. या दौऱ्यात शिवसेनेचे संपर्कप्रमुख आमदार सुनील शिंदे, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह पक्षाचे आजी-माजी पदाधिकारी, स्थानिक नेते आणि कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. दुष्काळाच्या झळा सर्वसामान्य शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण कुटुंबांना बसत असताना राजकीय आरोप-प्रत्यारोपांपलीकडे जाऊन मदतीची प्रत्यक्ष यंत्रणा उभी राहणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील पाणी पुसण्याऐवजी त्यांच्या शेतात पाणी पोहोचविण्याची आणि त्यांच्या हाताला आर्थिक आधार देण्याची गरज आहे. अशा परिस्थितीत आदित्य ठाकरे यांचा अहिल्यानगर दौरा न्याय मिळवून देणारा ठरणार आहे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

सुरों का सफर संगीत मैफिलीला

नगरकरांची उत्स्फूर्त दाद; सुमधुर गीतांनी रसिक मंत्रमुग्ध

दिव्यांग बांधवांच्या मदतीसाठी आयोजित मैफिलीला उत्स्फूर्त प्रतिसाद सुरेल गीतांनी रंगली अविस्मरणीय सांगीत संध्या



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– गझल, सुफी, चित्रपट संगीत आणि शास्त्रीय गीतांच्या सुरेल आविष्काराने अहिल्यानगरमधील संगीतप्रेमी रसिकांना मंत्रमुग्ध करणारी सुरों का सफर ही संगीत मैफल उत्साहात संपन्न झाली. गायकांच्या भावपूर्ण सादरीकरणाला रसिक श्रोत्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात आणि भरभरून दाद देत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संगीताच्या माध्यमातून आनंदाची अनुभूती देतानाच दिव्यांग बांधवांच्या मदतीचा सामाजिक संदेश दिला.

नेत्रतज्ज्ञ डॉ. राजीव चिटगोपेकर यांच्या सहकार्याने चिटगोपेकर व्हेंचर्सच्या 'द मेलडी मंदिर प्रॉडक्शन्स'तर्फे आर.सी. इंटिग्रिटी आणि 'द ड्युओ क्लब' यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मैफिलीमध्ये गायिका गीता कुलकर्णी, गायक प्रल्हाद जाधव आणि गिरिराज जाधव यांनी आपल्या सुरेल आवाजातून विविध लोकप्रिय गीतांचा नजराणा सादर केला. गुलाम अली, जगजीत सिंह, मेहंदी हसन, लता मंगेशकर, किशोरकुमार, आशा भोसले आणि पंकज उदास यांसारख्या दिग्गज गायकांच्या अजरामर गीतांची आणि गझलांची मैफल रंगली. जुन्या हिंदी चित्रपट गीतांपासून भावस्पर्शी गझलांपर्यंत विविध संगीत प्रकारांचा आनंद रसिकांना अनुभवला.

गायकांच्या सुरेल गायनातून गीतांमधील भाव, शब्दांची ताकद आणि संगीताची जादू उलगडली. रसिकांनी टाळ्यांच्या गजरात कलाकारांना दाद दिली. गझल गायनाच्या सादरीकरणाने वातावरण भावमय झाले. संगीतप्रेमींच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे संपूर्ण कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

संगीत ही केवळ मनोरंजनाची कला नसून समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देण्याचे प्रभावी माध्यम आहे, हा विचार या कार्यक्रमातून देण्यात आला. या माध्यमातून संकलित होणारी मदत दिवाळीनिमित्त दिव्यांग बांधवांना देण्यात येणार असल्याचे आयोजक डॉ. राजीव चिटगोपेकर यांनी सांगितले.

सुरेल संगीत, भावपूर्ण गझला, लोकप्रिय गीतांचा ठेवा आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम साधणारी ही मैफल नगरकर रसिकांसाठी संस्मरणीय ठरली. संगीताच्या आनंदासोबतच दिव्यांग बांधवांच्या मदतीचा संवेदनशील संदेश देत सुरों का सफर या कार्यक्रमाने सामाजिक बांधिलकी जपली.

गायक कलाकारांचा यावेळी चिटकोपेकर परिवाराच्या वतीने स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

या मैफिलीमध्ये भारतीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते ही भारतीय बैठक रसिकांचे आकर्षण ठरले.

निवेदन डॉ. स्मिता भुसे यांनी केले तर आभार आयोजक डॉ. राजीव चिटगोपेकर यांनी मानले.

मनोग्राममध्ये मानसिक आरोग्य संवर्धनाच्या चार अभिनव उपक्रमांचे दिमाखात उद्घाटन

पद्मश्री डॉ. मोहन आगाशे, डॉ. विद्याधर वाटवे, डॉ. सुजल वाटवे व खासदार लंके यांची उपस्थिती

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– मानसिक आरोग्य म्हणजे केवळ आजारांवर उपचार नव्हे, तर मनाला समजून घेणे, भावनांना अभिव्यक्ती देणे आणि प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करून देणे, या व्यापक विचारातून मनोग्रामने एक महत्त्वपूर्ण पाऊल पुढे टाकले आहे. निसर्गाच्या सान्निध्यात मानसिक आरोग्याची मशागत या अभिनव संकल्पनेवर आधारित मनोग्राम, शिराढोण (ता. नगर) येथे मानसिक आरोग्य संवर्धन आणि पुनर्वसनासाठी चार नावीन्यपूर्ण उपक्रमांचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. पद्मश्री डॉ. मोहन आगाशे, ज्येष्ठ मानसोपचारतज्ज्ञ डॉ. विद्याधर वाटवे आणि डॉ. सुजल वाटवे यांच्या हस्ते ग्रंथमंदिर, कलामंदिर, कृतज्ञतेचं घर आणि माइंड टॉकीज या उपक्रमांचे उद्घाटन करण्यात आले. तर या प्रकल्पाला खासदार निलेश लंके यांनी भेट दिली.

मनोग्राम हा केवळ मानसिक आजारांनी ग्रस्त आणि निराधार व्यक्तींच्या पुनर्वसनाचा प्रकल्प नसून, त्यांना प्रेम, आपुलकी, सन्मान आणि स्वावलंबनाच्या बळावर समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा अभिनव सामाजिक प्रयोग आहे. निसर्ग, शेती, कला, उपचार आणि समुदाय या पंचसूत्रीवर आधारित या प्रकल्पातून मानसिक स्वास्थ्य, व्यक्तिमत्त्व विकास, आत्मविश्वास आणि सामाजिक समावेशनासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. याच संकल्पनेचा विस्तार म्हणून चार स्वतंत्र उपक्रमांची सुरुवात करण्यात आली आहे.

वाचन ही केवळ ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया नसून मनाला समृद्ध करणारी आणि विचारांना सकारात्मक दिशा देणारी शक्ती आहे. हीच भूमिका लक्षात घेऊन ग्रंथमंदिराची निर्मिती करण्यात आली आहे. पुस्तकांच्या माध्यमातून वाचनसंस्कृती विकसित करणे, विचारविश्व समृद्ध करणे, मानसिक ताणतणावातून सकारात्मकतेकडे वाटचाल करण्यास मदत करणे आणि मानसिक स्वास्थ्य जपण्याची प्रेरणा देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. पुस्तकांच्या सहवासातून मनाला नवी ऊर्जा आणि विचारांना नवी दिशा देण्याचा प्रयत्न येथे केला जाणार आहे.



प्रत्येक व्यक्तीच्या मनात अनेक भावना, विचार आणि अनुभव दडलेले असतात. त्यांना व्यक्त होण्यासाठी योग्य माध्यम मिळणे आवश्यक असते. कलामंदिराच्या माध्यमातून चित्रकला, संगीत, नाट्य आणि इतर कलाप्रकारांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. कलेच्या माध्यमातून मनातील भावना व्यक्त करणे, सर्जनशीलतेला वाव देणे, आत्मविश्वास वाढविणे आणि मानसिक स्वास्थ्याला बळकटी देणे, अशी या उपक्रमाची संकल्पना आहे. कला ही मानसिक आरोग्य संवर्धनासाठी प्रभावी माध्यम ठरू शकते, हा संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनात माणसांमधील नातेसंबंध, प्रेम, जिव्हाळा आणि कृतज्ञतेची भावना जपणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. आपल्या आयुष्यात प्रेम, आदर आणि आधार देणाऱ्या व्यक्तींविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कृतज्ञतेचं घर ही विशेष जागा निर्माण करण्यात आली आहे. आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान असलेल्या व्यक्तींची आठवण, त्यांच्याविषयीचा आदर आणि मनातील भावना व्यक्त करण्याची संधी या माध्यमातून उपलब्ध होणार आहे. सकारात्मकता, भावनिक जिव्हाळा आणि मानवी नातेसंबंध अधिक दृढ करण्याचा हा संवेदनशील प्रयत्न आहे.

चित्रपट आणि दृकश्राव्य माध्यमांच्या प्रभावी वापरातून मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी माइंड टॉकीज हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. विशेषतः विद्यार्थी आणि तरुणांमध्ये मानसिक आजार, आत्महत्या प्रतिबंध, व्यसनमुक्ती, भावनिक स्वास्थ्य आणि मानसिक आरोग्याशी संबंधित विविध विषयांबाबत समज निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे.



कापूरवाडी तलाव कोरडा....चालू वर्षात पावसाचे प्रमाण कमी झाले, त्याचा परिणाम दुष्काळाचे सावट गडद होत आहे. नोव्हेंबर मध्येच अशी परिस्थिती असल्याने तलाव भरण्यासाठी पुढील पावसाची वाट पहावी लागणार आहे. तो पर्यंत प्रत्येकाने पाणी काटकसरीने वापरणे काळाची गरज आहे. (छाया – विजय मते)



दीपावलीचा सण अवघ्या काही दिवसावर आला असल्याने खरेदी करण्यासाठी कापड बाजारात मोठी गर्दी होत आहे. (छाया – राजू खरपुडे ,नगर)

बी.एस्सी. नर्सिंगसाठी नोंदणीची मुदत ६ नोव्हेंबरपर्यंत

संधी चुकवू नका, अबेदा पी. इनामदार यांचे आवाहन । नोंदणी, ऑनलाइन शुल्क भरणे आणि कागदपत्रे सादर करणे यासाठी वेगवेगळ्या अंतिम तारखा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– महाराष्ट्रात बी.एस्सी. नर्सिंग प्रवेशासाठी नव्या निकषांनुसार पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांनी ६ नोव्हेंबर रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाइन नोंदणी आणि ''सेशन अप्लाय'' ही प्रक्रिया पूर्ण करावी. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या सूचनेनुसार, ही प्रक्रिया २०२६२७ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशासाठी आहे.

महाराष्ट्र मेडिकल एज्युकेशन अँड रिसर्च सेंटरच्या (एमएमईआरसी) अध्यक्षा श्रीमती अबेदा पी. इनामदार यांनी आझम कॅम्पस, पुणे येथील अबेदा पी. इनामदार नर्सिंग कॉलेजच्या वतीने विद्यार्थी आणि पालकांना हे आवाहन केले आहे.

''केवळ अंतिम तारीख चुकली म्हणून कोणत्याही विद्यार्थ्याची संधी हुकू नये. प्रत्येक अर्जामागे एका विद्यार्थ्याचे स्वप्न आणि कुटुंबाची मेहनत असते. १५ नोव्हेंबर ही प्रवेशाची अंतिम तारीख आहे. नोंदणीची मुदत त्याआधीच संपते, हे पालकांनी लक्षात घ्यावे. आपल्या मुलाचा किंवा मुलीचा अर्ज तपासा आणि सर्व आवश्यक टप्पे वेळेत पूर्ण करा,'' असे श्रीमती अबेदा पी. इनामदार म्हणाल्या.

विद्यार्थ्यांनी पुढील तीन टप्पे पूर्ण करणे आवश्यक आहे:

– ऑनलाइन नोंदणी आणि 'सेशन अप्लाय'': ही प्रक्रिया ६ नोव्हेंबर रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत पूर्ण करावी.

– नोंदणीचे शुल्क भरणे: अधिकृत ऑनलाइन पेमेंट सुविधेद्वारे ७ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत शुल्क भरावे. शुल्क यशस्वीपणे भरल्यानंतरच नोंदणी पूर्ण झाल्याचे मानले जाईल.

– कागदपत्रे अपलोड करून अर्ज सादर करणे: आवश्यक मूळ कागदपत्रांच्या रंगीत स्कॅन प्रती अपलोड कराव्यात. त्यानंतर ७ नोव्हेंबर रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत 'सबमिट' बटणावर क्लिक करावे. केवळ कागदपत्रे अपलोड करणे पुरेसे नाही.

आवश्यक कागदपत्रे सादर केली नाहीत, तर अर्जाचा संबंधित प्रवर्गातून विचार होणार नाही किंवा अर्ज नाकारला जाऊ शकतो.



सूचनेत नमूद केलेल्या प्रवर्गांसाठी सीईटीतील पात्रतेची किमान पर्सेंटाइल मर्यादा शून्य करण्यात आली आहे. तरीही संबंधित नर्सिंग सीईटी परीक्षा दिलेली असणे आणि प्रवेशाच्या इतर अटी पूर्ण करणे आवश्यक आहे. आधीच नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनी पुन्हा नोंदणी करू नये.

संस्थास्तरावरील दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी पात्र विद्यार्थ्यांनी ८ ते १० नोव्हेंबरदरम्यान संबंधित महाविद्यालयात ठरलेल्या नमुन्यात अर्ज करावा. याची अंतिम मुदत १० नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत आहे. केवळ ऑनलाइन नोंदणी केल्याने प्रवेश निश्चित होत नाही.

२७ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ५.३० वाजता ज्यांच्याकडे प्रवेशासाठी मिळालेली जागा होती, तसेच संस्थास्तरावरील पहिल्या फेरीत प्रवेश घेतलेले विद्यार्थी दुसऱ्या फेरीसाठी पात्र नाहीत.आर्थिक मदतीची गरज असलेल्या कुटुंबांनी शिष्यवृत्तीच्या पर्यायांची माहिती घ्यावी, असेही श्रीमती इनामदार यांनी सांगितले.

''नर्सिंग शिकण्याची इच्छा आणि मेहनत करण्याची तयारी असलेल्या विद्यार्थ्यांना उपलब्ध मदतीची माहिती मिळाली पाहिजे. आमचे महाविद्यालय अल्पसंख्याक संस्था आहे. पात्र आणि मेहनती विद्यार्थ्यांनी अर्ज करावा. त्यांच्यासाठी योग्य शिष्यवृत्ती शोधण्यासाठी आणि अर्ज पूर्ण करण्यासाठी आम्ही शक्य ती मदत करू,'' असे श्रीमती अबेदा पी. इनामदार म्हणाल्या.

अभ्यासक्रम, शिष्यवृत्तीचे मार्गदर्शन आणि प्रवेश प्रक्रियेची माहिती घेण्यासाठी विद्यार्थी व पालक अबेदा पी. इनामदार नर्सिंग कॉलेजशी +९१ ७४४७४ ४२१०३ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

सविता रमेश फिरोदिया प्रशालेचा सामाजिक बांधिलकीचा आदर्श; चार स्वयंसेवी संस्थांना दिवाळी भेटीचे वाटप

समाजातील गरजू व्यक्तींच्या अडचणी समजून घेऊन त्यांना मदतीचा हात देणे ही आपली सामूहिक जबाबदारी – दिलीप गुंदेचा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– दिवाळी हा आनंद, उत्साह, मांगल्य आणि आपुलकीचा सण आहे. या सणाचा आनंद समाजातील प्रत्येक घटकाला घेता यावा, विशेषतः गरजू, वंचित आणि विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून आधार मिळणाऱ्या व्यक्तींची दिवाळीही आनंददायी व्हावी, या सामाजिक जाणिवेतून सविता रमेश फिरोदिया प्रशालेच्या वतीने दिवाळी भेट उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत शहर व परिसरातील चार स्वयंसेवी संस्थांना किराणा साहित्य, दिवाळी फराळ आणि विविध जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करण्यात आले. शिक्षणाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपण्याची परंपरा कायम ठेवत प्रशालेने राबविलेल्या या उपक्रमातून सामाजिक उत्तरदायित्वाचा आदर्श निर्माण केला आहे.

या उपक्रमांतर्गत अरणगाव येथील मानव सेवा प्रकल्प, केडगाव येथील सावली प्रकल्प, मोहोज खुर्द येथील मानव सेवा प्रतिष्ठान आणि तपोवन रोड येथील बालघर प्रकल्प या चार संस्थांना दिवाळीनिमित्त मदतीचे साहित्य देण्यात आले. या संस्थांच्या माध्यमातून विविध गरजू घटकांसाठी सामाजिक कार्य केले जाते. अशा संस्थांना सणासुदीच्या काळात आवश्यक साहित्याची मदत मिळाल्याने त्यांच्यावरील काही प्रमाणातील आर्थिक भार हलका होण्यास मदत होते. दिवाळीच्या काळात प्रत्येक घरात आनंदाचे वातावरण असते; मात्र समाजातील काही घटकांना आर्थिक व अन्य अडचणींमुळे सणाचा आनंद अपेक्षित स्वरूपात घेता येत नाही. ही बाब लक्षात घेऊन प्रशालेच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले की, शिक्षणसंस्था ही केवळ विद्यार्थ्यांना शिक्षण देणारी संस्था नसून समाजाच्या जडणघडणीतही तिची महत्त्वाची भूमिका असते. विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच सामाजिक जबाबदारी, माणुसकी, सहकार्य आणि सेवाभाव यांचे संस्कार मिळणे आवश्यक आहे. समाजातील गरजू व्यक्तींच्या अडचणी समजून घेऊन त्यांना मदतीचा हात देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. दिवाळीसारख्या आनंदाच्या सणात समाजातील प्रत्येक घटक सहभागी व्हावा, या भावनेतून प्रशालेच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. अशा उपक्रमांमुळे समाजातील विविध घटकांमध्ये आपुलकी आणि परस्पर सहकार्याची भावना वृद्धिंगत होते, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी अरणगाव मानवसेवा प्रकल्पाचे अंबादास गुंजाळ ,केडगाव सावलीचे सुरेश झडे ,तपोवन रोडवरील बालघर प्रकल्प च्या रुक्मिणी ठोंबरे ,मोहजखूर्द येथील मानवसेवा प्रतिष्ठानचे प्रा सुनील मतकर आदी उपस्थित होते संस्थेचे उपाध्यक्ष दशरथ खोसे यांनी मनोगत व्यक्त करताना, सणांचा खरा आनंद इतरांच्या जीवनात आनंद निर्माण करण्यात असतो. दिवाळीच्या निमित्ताने गरजू संस्थांना मदत करून त्यांच्या कार्याला हातभार लावण्याचा प्रशालेचा प्रयत्न निश्चितच महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले.

सहसचिव राजेश झालानी यांनी सामाजिक संस्थांचे कार्य समाजासाठी मोलाचे असून अशा संस्थांना वेळोवेळी सहकार्य मिळणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधताना त्यांच्यामध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी, इतरांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची वृत्ती विकसित व्हावी आणि समाजाप्रती असलेले कर्तव्य समजावे, या उद्देशाने प्रशाला विविध उपक्रमांचे आयोजन करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थेचे खजिनदार विजय मुनोत यांनी प्रशालेच्या माध्यमातून शिक्षणासोबत सामाजिक उपक्रमांनाही प्राधान्य दिले जात असल्याचे सांगत, समाजातील गरजू घटकांसाठी अशा उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली.प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका योगिता गांधी यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या व प्रशालेच्या वतीने वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक, सामाजिक आणि विद्यार्थीहिताच्या उपक्रमांची माहिती दिली.विद्यार्थ्यांना सामाजिक कार्याची ओळख प्रत्यक्ष कृतीतून व्हावी, हा अशा उपक्रमांमागील महत्त्वाचा हेतू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष दिलीप गुंदेचा, उपाध्यक्ष दशरथ खोसे, सचिव र. दो. कासवा, सहसचिव राजेश झाला, खजिनदार विजय मुनोत, विश्वस्त रश्मी येवलेकर, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक दत्तात्रय कसबे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका योगिता गांधी आदी उपस्थित होते.दिवाळी भेट उपक्रमाच्या माध्यमातून चार स्वयंसेवी संस्थांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्यात आला. केवळ सण साजरा करण्यापुरता विचार न करता समाजातील गरजू घटकांचाही आनंदात सहभाग असावा, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

महापालिका कर्मचारी पतसंस्थेकडून सहा सभासदांना दीड लाखांची वैद्यकीय मदत

प्रत्येकी २५ हजार रुपयांचे धनादेश चेअरमन बाबासाहेब मुदगल यांच्या हस्ते प्रदान



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेचा सभासद हा संस्थेचा मुख्य घटक असून, सभासदांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने पतसंस्थेच्या वैद्यकीय मदत निधीतून आर्थिक सहाय्य केले जाते. अनेकदा आर्थिक परिस्थितीमुळे कर्मचारी आजारपणाकडे दुर्लक्ष करून आजार अंगावर काढतात. त्यामुळे त्यांच्या आजाराचे वेळेवर निदान होऊन योग्य उपचार मिळावेत, या उद्देशाने पतसंस्थेच्या वतीने मदत केली जाते. याच उपक्रमांतर्गत सहा सभासदांना प्रत्येकी २५ हजार रुपयांप्रमाणे एकूण दीड लाख रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली, अशी माहिती पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुदगल यांनी दिली.

अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासदांना वैद्यकीय मदत निधीतून देण्यात येणाऱ्या धनादेशांचे वाटप चेअरमन बाबासाहेब मुदगल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. घनकचरा विभागातील सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर असल्याचे सांगून मुदगल म्हणाले की, या विभागातील कर्मचाऱ्यांकडून वैद्यकीय मदत निधीसाठी मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त होत आहेत. यावरून अनेक सफाई कर्मचारी स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करून नियमितपणे स्वच्छतेचे काम करत असल्याचे दिसून येते. आर्थिक अडचणींमुळे आजारपणाकडे दुर्लक्ष होऊ नये आणि कर्मचाऱ्यांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी पतसंस्था मदतीचा हात देत आहे.

घनकचरा विभागातील कर्मचाऱ्यांच्या आरोग्यविषयक समस्यांची गंभीर दखल घेण्याची गरज आहे. महापालिकेच्या माध्यमातून या कर्मचाऱ्यांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती करणे, नियमित आरोग्य तपासणी आणि आवश्यक वैद्यकीय उपाययोजना राबविणे गरजेचे आहे. कर्मचाऱ्यांनीही आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये, असे आवाहन मुदगल यांनी केले.

यावेळी व्हाईस चेअरमन कैलास चावरे म्हणाले की, सभासद विजय सोनसळे, अमोल कांबळे, धीरज चव्हाण, सुभाष वाघमारे, रामदास पाचारणे आणि अनिल मंडलिक यांच्या वैद्यकीय उपचारांसाठी पतसंस्थेच्या वैद्यकीय मदत निधीतून प्रत्येकी २५ हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे. सभासदांच्या अडचणीच्या काळात त्यांना आर्थिक आधार मिळावा आणि उपचारासाठी मदत व्हावी, यासाठी पतसंस्था सातत्याने प्रयत्नशील आहे. सभासदांच्या हिताचे निर्णय घेण्यास कर्मचारी सहकारी पतसंस्था नेहमीच प्राधान्य देते, असे त्यांनी सांगितले.

या धनादेश वाटपप्रसंगी व्हाईस चेअरमन कैलास चावरे, तज्ज्ञ संचालक जितेंद्र सारसर, संचालक सतीश ताठे, बाळासाहेब पवार, विकास गीते, बलराज गायकवाड, शेखर देशपांडे, किशोर कानडे, गुलाब गाडे, अजय कांबळे, बाळासाहेब गंगेकर, सोमनाथ सोनवणे, विजय कोतकर, कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी आदींसह पतसंस्थेचे सभासद उपस्थित होते.

(पान १ वरून)

विखे-थोरात एकजुटीचा सहकारात ऐतिहासिक विजय!

महिला मतदारसंघांमध्ये आघाडीच्या उमेदवारांना मिळालेला भक्कम पाठिंबा हा या विजयाचा महत्त्वाचा पैलू ठरला. विविध मतदारसंघांतील मतमोजणीदरम्यान उमेदवारांनी घेतलेली मोठी आघाडी पाहता मतदारांनी सहकार विकास आघाडीच्या नेतृत्वावर ठाम विश्वास व्यक्त केल्याचे चित्र स्पष्ट झाले.

निवडणूक प्रक्रियेत संगमनेरमधून रणजीतसिंह देशमुख, नेवासा येथून शंकरराव गडाख, राहाता येथून डॉ. सुजय विखे पाटील, श्रीरामपूरमधून करण ससाणे, पाथर्डीतून आमदार मोनिका राजळे, शेवगावमधून राजश्री घुले पाटील, श्रीगोंद्यातून दत्तात्रय पानसरे, कोपरगावमधून बिबिन कोल्हे, नगर तालुक्यातून अक्षय कर्डिले आणि बिगरशेती मतदारसंघातून सचिन जगताप यांची बिनविरोध निवड झाली. विविध तालुक्यांतील नेतृत्वाने सहकार विकास आघाडीला दिलेली साथ आणि निवडणुकीपूर्वीच झालेली ही बिनविरोध निवड आघाडीच्या संघटनात्मक ताकदीचे द्योतक ठरली.

प्रत्यक्ष निवडणुकीतही मोठ्या मताधिक्याने विजयाची मोहोर

प्रत्यक्ष निवडणुकीतही सहकार विकास आघाडीच्या उमेदवारांनी आपले वर्चस्व कायम राखले. काळे आशुतोष अशोकराव, नागवडे अनुराधाताई राजेंद्र, वाघ संगीता जयंत, पिचड वैभव मधुकर, जवळे करभारी झुंबर, सांगळे गणपतराव पुंजाजी आणि तनपुरे प्राजक्त प्रसाद यांनी विजय संपादन केला. अनेक मतदारसंघांत प्रतिस्पर्धी उमेदवारांना मोठ्या फरकाने मागे टाकत आघाडीच्या उमेदवारांनी विजय मिळविला. त्यामुळे सहकार विकास आघाडीच्या विजयाची व्याप्ती केवळ संख्यात्मक नसून मतदारांचा ठाम आणि निर्णायक कौल असल्याचे या निकालातून अधोरेखित झाले. या निवडणुकीतील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे विखे-थोरात यांच्या एकजुटीला मिळालेला व्यापक प्रतिसाद. जिल्ह्याच्या राजकारणात वेगवेगळ्या काळात प्रभावी भूमिका बजावणाऱ्या नेतृत्वाने सहकार क्षेत्राच्या हितासाठी एकत्रितपणे काम करण्याची भूमिका घेतली. या एकत्रित प्रयत्नांना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, शंकरराव गडाख, चंद्रशेखर घुले यांच्यासह जिल्ह्यातील सर्व प्रमुख नेत्यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले. नेत्यांमधील समन्वय, तालुकानिहाय नियोजन, कार्यकर्त्यांची एकजूट आणि सभासदांशी असलेला थेट संपर्क यामुळे आघाडीला निवडणुकीत निर्णायक यश मिळाले. जिल्हा बँकेच्या निवडणुकीतून विखे-थोरात यांच्या एकत्रित नेतृत्वाची ताकद पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून, या निकालाचे पडसाद आगामी जिल्ह्याच्या राजकीय आणि सहकार क्षेत्रातील समीकरणांवरही उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या ऐतिहासिक विजयाबद्दल सहकार विकास आघाडीतर्फे जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधव, बँकेचे सभासद, मतदार, सहकारी संस्थांचे प्रतिनिधी, कार्यकर्ते आणि हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले आहेत. मतदारांनी दाखविलेला विश्वास आणि दिलेली साथ हीच आघाडीची खरी ताकद असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. जिल्हा बँक ही शेतकरी, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सहकार चळवळीचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. त्यामुळे या विजयातून मिळालेली जबाबदारी अधिक व्यापक असून, जिल्ह्यातील सहकार क्षेत्र अधिक सक्षम करणे, शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या बळकटी देणे, सहकारी संस्थांचे सक्षमीकरण करणे आणि बँकेच्या माध्यमातून ग्रामीण विकासाला गती देणे यासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची भूमिका आघाडीतर्फे व्यक्त करण्यात आली. १८ पैकी १७ जागांवरील विजय, अनेक मतदारसंघांतील मोठे मताधिक्य आणि बिनविरोध निवडींच्या माध्यमातून सहकार विकास आघाडीने जिल्हा बँकेवर आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. हा विजय केवळ निवडणुकीचा निकाल नसून जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील एकजूट, नेतृत्वावरील विश्वास आणि सामूहिक प्रयत्नांना मिळालेली मोठी पावती ठरला आहे.

कोपरगावात अल्पवयीन मुलाची आत्महत्या

त्यांनी लेखी फिर्याद दिली आहे.एका अल्पवयीन मुलाच्या मृत्यूमागील नेमकी कारणे काय? प्रेमसंबंधातून मानसिक दबाव निर्माण झाला होता का? महागड्या वस्तूंच्या मागणीमुळे त्याला त्रास दिला जात होता का? या प्रश्नांची उत्तरे आता पोलीस तपासातून समोर येणार आहेत.या घटनेने कोपरगाव शहरात हळहळ व्यक्त होत असून, अल्पवयीन मुलांच्या भावनिक आणि मानसिक अवस्थेकडे कुटुंबीयांनी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.